# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निववि/२० दिनांक : १३ जानेवारी, २०२६

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५—२०२६ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिसंवाद आयोजन अर्थसहाय्य योजना' (योजना क्र. ०४२५२६) या उपक्रमाअतंर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त **'राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिसंवाद आयोजन अर्थसहाय्य योजना' (योजना क्र. ०४२५२६)** या उपक्रमाअंतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **मंगळवार, दिनांक १३/०१/२०२६ ते मंगळवार, दिनांक २७/०१/२०२६** असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

आपणास विनंती की, सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत नियमावलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून **गुरूवार दिनांक २९/०१/२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. नियमावलीमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,

13.1.26.

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

सोबत : योजना व नियमावली

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम
## योजना क्रमांक : ०४२५२६

**योजनेचे नाव : राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिसंवाद आयोजन अर्थसहाय्य योजना**

**प्रस्तावना :**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिसंवाद आयोजनासाठी विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य देण्याचे प्रस्तावित आहे.

विद्यापीठाने निश्चित केलेल्या विषयांवर कार्यशाळा/परिसंवादाचे आयोजन करण्यात यावे.

**कार्यशाळा/परिसंवाद आयोजनासाठी रूपरेषा :**

१) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी नॅक/एनबीए मुल्यांकनासाठी पात्र झाल्यावर एकदा तरी नॅक/एनबीए मुल्यांकन केलेले आहे अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेस अर्ज करण्यास पात्र राहतील.

२) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांकडे विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ/प्रभारी प्राचार्य/संचालक आहेत अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेसाठी कार्यशाळेचे/परिसंवादाचे आयोजन करण्यास पात्र राहतील.

३) महाविद्यालये/परिसंस्थांना राज्य किंवा राष्ट्रीय कार्यशाळेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

४) सदर कार्यशाळा/परिसंवादाची सुरूवात विद्यापीठ गीताने करण्यात यावी.

विद्यापीठ गीत खालील लिंकवर उपलब्ध आहे.

**www.unipune.ac.in—Home page—Planning and Development—Circular For Colleges**

५) विषयतज्ञ/साधनव्यक्ती यांना पुस्तक/वृक्षाचे रोप देऊन स्वागत करण्यात यावे. (हार/पुष्पगुच्छ यांचा वापर करण्यात येऊ नये.)

६) व्यासपीठावरील बॅनरवर **'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत'** असा उल्लेख असणे आवश्यक आहे.

७) राज्यस्तरीय कार्यशाळा यासाठी उपस्थित रहाणाऱ्या साधनव्यक्तीस प्रत्येकी एका व्याख्यानाचे रू.२०००/— (रु. दोन हजार फक्त) इतके मानधन देय राहील. व राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तीस प्रत्येकी एका व्याख्यानाचे रू. ३०००/— (रु. तीन हजार फक्त) इतके मानधन देय राहिल. (एकाच साधन व्यक्तीला दोन व्याख्यानापेक्षा जास्त मानधन देण्यात येऊ नये.) उपरोक्त कार्यशाळा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास

यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधन व्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील.

८) विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे अर्थसहाय्य ७०:३० प्रमाणात मंजूर करण्यात येईल.

| अ. क्र | स्तर | कालावधी | कमीत कमी सहभागी व्यक्तींची संख्या | पैकी विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्तींची संख्या | पैकी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सहभागी शिक्षकांची संख्या | अधिकतम अर्थसहाय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय | १ दिवस | ५० | विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील सहभागी व्यक्ती किमान २५ | विद्यापीठ कार्यक्षेत्रातील किमान २५ सहभागी शिक्षक | रु. ६०,०००/— |
| २ | राष्ट्रीय | २ दिवस | ५० | राज्याबाहेरील किमान १० सहभागी व्यक्ती व विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील किमान १० सहभागी व्यक्ती | विद्यापीठ कार्यक्षेत्रातील किमान २५ सहभागी शिक्षक | रु. १,२५,०००/— |

९) सदर कार्यशाळा/परिसंवादासाठी (सेमिनार) विद्यापीठाने निश्चित केलेले विषय खालीलप्रमाणे आहेत.

१) विकसित भारत २०४७ मध्ये महाविद्यालयांचे योगदान
२) विद्यार्थ्यांची जडणघडण आणि आत्मनिर्भर भारत
३) सायबर सिक्युरिटी आणि सायबर हायजिन
४) कटींग एज रिसर्च ॲण्ड इनोव्हेशन
५) ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी
६) उच्च शिक्षण व शाश्वत विकास
७) कृत्रिम बुध्दिमत्ता व मशिन लर्निंग
८) उच्च शिक्षणामध्ये महिलांचा सहभाग
९) डिजिटल वेलनेस
१०) इमोशनल इंटिलेजन्स

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे-७

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम
## योजना क्रमांक : ०४२५२६

**योजनेचे नाव : राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिसंवाद आयोजन अर्थसहाय्य योजना नियमावली**

१) विद्यापीठाने अर्थसहाय्य मंजूरीची यादी जाहीर केलेल्या दिनांकानंतर महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये सदर कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन करण्यात यावे.

२) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी नॅक/एनबीए मुल्यांकनासाठी पात्र झाल्यावर एकदा तरी नॅक/एनबीए मुल्यांकन केलेले आहे अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेस अर्ज करण्यास पात्र राहतील.

३) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांकडे विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ/प्रभारी प्राचार्य/संचालक आहेत अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेसाठी कार्यशाळेचे/परिसंवादाचे आयोजन करण्यास पात्र राहतील.

४) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडून परीक्षा अथवा अन्यकामी उचल रक्कम घेतली असेल व त्याचे हिशेब विहित वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे. हिशेब/उचल रक्कम प्रलंबित नसल्याबाबतचे प्राचार्यांनी दिलेले प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

५) शैक्षणिक/औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारी व्यक्ती जर कार्यशाळेस उपस्थित राहणार असेल तर ती व्यक्ती काम करीत असलेल्या संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेच्या अथवा अस्थापनेच्या ओळखपत्राची दोन्ही बाजूची सुस्पष्ट प्रत संबंधितांनी स्व:स्वाक्षरीने साक्षांकित केलेली असली पाहीजे.

६) राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधन व्यक्तीचे मानधन व प्रवास भत्त्यांचा स्वतंत्र क्लेम फॉर्म जोडण्यात यावा. सदर मानधन व प्रवास भत्त्याच्या क्लेम फॉर्मवर संबंधित साधन व्यक्तींची आगाऊ स्टॅम्प रिसिटवर व रक्कम क्लेम केल्याच्या ठिकाणी स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

७) राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधन व्यक्तींनी इकॉनॉमी क्लास विमान प्रवासखर्च देय राहील. इकॉनॉमी क्लास विमानप्रवासाच्या देयकासोबत तिकिट, बोर्डींग पासची मूळ प्रत व व्हिसा झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे. तसेच निवासस्थानापासून ते विमानतळ ते कार्यस्थळ असा प्रवास टॅक्सीने केला असल्यास त्याची मूळ देयके जोडणे आवश्यक आहे. तरच टॅक्सी प्रवासाची देयके अदा केली जातील. तसेच रेल्वे अथवा बस प्रवासाची देयके सादर करताना मूळ तिकिटे सादर करणे आवश्यक आहे व या देयकावर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन विकास पुणे-७

८) साधन व्यक्तीस राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी स्वतःचे किंवा भाडेतत्वावरील वाहनखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील. साधन व्यक्तीने स्वतःच्या वाहनाने प्रवास केला असल्यास RCTC ची झेरॉक्स प्रत, टोलची बिले, प्रवास भत्त्याच्या फॉर्मला जोडून माहिती भरुन देणे आवश्यक आहे. अथवा भाडेतत्वावर गाडीने प्रवास केला असल्यास ट्रॅव्हल्स एजन्सीची देयके विद्यापीठ नियमानुसार अदा केली जातील. सदरची देयके टोलबिलासहित जोडणे आवश्यक आहे व या देयकावर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

९) कार्यशाळेचा हिशोब सादर करताना Estimate, Quotation, Approval Memo असे लिहिलेली देयके म्हणून जोडली जातात. तसेच साध्या कागदावर दुकानाच्या नावाचा स्टॅम्प असलेली देयके जोडली जातात. ही देयके ग्राह्य धरली जाणार नाहीत. Tax Invoice/Cash Memo असलेली नियमानुसार व जीएसटी भरलेलीच देयके ग्राह्य धरली जातील. प्रत्येक देयकावर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

१०) रु.५,०००/— वरील सर्व देयकांची रेव्हेन्यू स्टॅम्प रिसीट असणे आवश्यक आहे.

११) कार्यशाळेचे आयोजन केलेले ६X४ आकाराचे सुस्पष्ट फोटो (फोटोवर दिनांक व वेळ दिसेल असे) जोडावेत. सदर फोटो पैकी एक फोटो स्टेजवरील मान्यवर व बॅनरसह असावा व एक समोरील सहभागी व्यक्तींचा असावा.

१२) कार्यशाळेच्या प्रत्येक दिवसाची स्वतंत्र उपस्थिती घेणे अनिवार्य आहे. मूळ उपस्थिती पत्रकावर सहभागी व्यक्तींचे नाव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर व स्वाक्षरी घेवून सदर यादी अद्ययावत ठेवण्यात यावी.

**टीप : महाविद्यालये/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना कार्यशाळा यामध्ये उपस्थित राहता येईल. परंतु सहभागी व्यक्तींच्या यादीमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश अनुदानासाठी अनुज्ञेय राहणार नाही. सहभागी विद्यार्थ्यांची यादी स्वतंत्रपणे जोडणे आवश्यक आहे.**

१३) कार्यशाळा यामध्ये सहभागी व्यक्तींची उपस्थिती पत्रकामध्ये माहिती खालीलप्रमाणे असावी. तसेच त्यासोबत सहभागी व्यक्ती ज्या संस्थेमध्ये कार्यरत असेल तेथील ओळखपत्राची आणि संबंधिताना त्यांच्या आस्थापनेने उक्त कार्यशाळेमध्ये उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त केल्याचा पुरावा/पत्राची छायांकित प्रत यादीसोबत जोडणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | सहभागी व्यक्तींचे नाव व महाविद्यालये/ परिसंस्थेचा पत्ता | भ्रमणध्वनी क्रमांक | ई—मेल | स्वाक्षरी (दिनांकासह) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

१४) गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्यानुसार राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेचा विनियोग खालील

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन विकास पुणे-७

टक्केवारीनुसार करण्यात यावा. यामध्ये विद्यापीठाचा हिस्सा ७० टक्के आणि महाविद्यालये/संस्थाचा हिस्सा ३० टक्के असा राहील.

अ. साधन व्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च — ४० टक्के

ब. संशोधन पत्रिका/लेख प्रकाशन — १० टक्के

क. परिषदेसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य/छायांकित प्रत इ. — २० टक्के

ड. अतिथीखर्च, किरकोळ व आकस्मिक खर्च — ३० टक्के

१५) उपरोक्त नमूद केलेल्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्याचा विनियोग त्या त्या अर्थशीर्षासाठी करण्यात यावा. अन्य अर्थशीर्षासाठी खर्च करण्यात येवू नये. (उदा. अ—४० टक्के, ब—१० टक्के, क—२० टक्के, ड—३० टक्के, यामध्ये त्या त्या टक्केवारीपेक्षा जास्त खर्च देय होणार नाही किंवा त्या टक्केवारीमधील शिल्लक रक्कम इतरत्र वापरता येणार नाही.) प्राचार्यांना यामध्ये १० टक्के बदल करण्याचे अधिकार असतील

१६) संबंधीत महाविद्यालये/परिसंस्था/आस्थापनेच्या लेटर हेडवर सदर व्यक्तीस कार्यशाळेस उपस्थित रहाण्यासाठी कार्यमुक्त केल्याचा पुरावा, कार्यशाळेचे हिशोब सादर करताना सहभागी व्यक्तींच्या यादीबरोबर जोडणे बंधनकारक आहे.

१७) औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सहभागी व्यक्तींच्या ओळखपत्रांवर कंपनीचे नाव, तिथे काम करणाऱ्या व्यक्तीचे नाव, फोटो, कंपनीचे ठिकाण, दूरध्वनी क्रमांक, अधिकाऱ्यांची सही व ओळखपत्रधारक व्यक्तीचे पद इत्यादी उल्लेख असणे गरजेचे आहे. अशा सहभागी व्यक्तींना ओळखपत्रासोबत संबंधित अस्थापनेचे पत्र जोडणे अनिवार्य आहे.

१८) जर कार्यशाळेस औद्योगिक क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित रहाणार असतील तर त्यांचे प्रमाण कार्यशाळेस विद्यापीठ क्षेत्रामधील तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील एकूण सहभागी व्यक्तींच्या संख्येच्या प्रमाणात ५० टक्के पेक्षा जास्त असू नये.

१९) महाराष्ट्राबाहेरील एखादी व्यक्ती जर महाराष्ट्रातील कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कार्यरत अध्यापक/प्रवेशित विद्यार्थी/ नोंदणीकृत संशोधक निमित्ताने रहात असेल तर अशा व्यक्तीस महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील संलग्न महाविद्यालये/परिसंस्थेतील कार्यरत अध्यापकांनी जर विद्यापीठ क्षेत्राबाहेरील विद्यापीठात पीएच.डी. संशोधन पदवीसाठी प्रवेश घेतला असेल तर अशा व्यक्तींना विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील अथवा महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहित धरता येणार नाही. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयाच्या संस्थेचे जर स्वतंत्र खाजगी विद्यापीठ असेल तर अशा खाजगी विद्यापीठातील व्यक्तींना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून ग्राह्य धरता येणार नाही.

२०) महाविद्यालये/परिसंस्थेने आयोजन करण्यात येणाऱ्या कार्यशाळेसाठी साधन व्यक्तींचा व्याख्यानाचा दिवस, वेळ व विषय यांचे वेळापत्रक हिशोबासोबत सादर करणे आवश्यक आहे त्यानुसारच साधन व्यक्तींचे मानधन प्रतिदिवसानुसार देय होईल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
नियोजन व विकास
पुणे-७

- राज्यस्तरीय कार्यशाळा यासाठी उपस्थित रहाणाऱ्या साधनव्यक्तीस प्रति दीड तासाचे प्रत्येकी एका व्याख्यानाचे प्रत्येकी रु.२०००/— (रु. दोन हजार फक्त) इतके मानधन देय राहील.
- राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तीस प्रति दीड तासाचे प्रत्येकी एका व्याख्यानाचे रु.३०००/— (रु. तीन हजार फक्त) इतके मानधन देय राहिल.(एकाच साधन व्यक्तीला दोन व्याख्यानापेक्षा जास्त मानधन देण्यात येऊ नये.) उपरोक्त कार्यशाळा यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधन व्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील.

२१) कार्यशाळेस उपस्थित साधन व्यक्तींना सहभागी व्यक्ती म्हणून दाखविता येणार नाही. ज्या विषयाची कार्यशाळा आयोजित केली असेल त्या विषयांशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना सहभागी व्यक्ती दाखविता येणार नाहीत.

२२) कार्यशाळा आयोजित केल्यानंतर त्याची देयके विद्यापीठास सादर करताना त्यासोबत व्यासपीठ व त्यावरील बॅनर तसेच सभागृहात उपस्थित सहभागी व्यक्ती यांचे स्पष्ट छायाचित्र (फोटोग्राफ) जोडणे आवश्यक आहे.

२३) कार्यशाळेस उपस्थित सहभागी व्यक्तींच्या दोन दिवस उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी दोन दिवसांच्या स्वतंत्र उपस्थित पत्रकावर घेणे अनिवार्य आहे.

२४) विषयाशी संबंधित असलेल्या औद्योगिक क्षेत्रातील सहभागी व्यक्तींनाच कार्यशाळेमध्ये सहभागी व्यक्ती म्हणून दाखविता येईल.

२५) महाविद्यालय/परिसंस्थेने राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केल्यानंतर त्याचे कार्यवृत्तांत अहवाल (प्रोसीडींग) छापणे अनिवार्य आहे.

२६) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज केला असेल अथवा ज्या महाविद्यालयात नवीन विद्यार्थी संख्या शून्य आहे. अशा महाविद्यालय/परिसंस्थेस कार्यशाळा आयोजन करण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी कार्यशाळेचे आयोजन केल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

२७) कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसस्थेने जर प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती भरल्यास संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र समजण्यात येईल.

२८) गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत महाविद्यालय/परिसंस्थाकडून होणारी सर्व प्रकारची वस्तु व सेवा याची खरेदी GST नोंदणीकृत पुरवठादाराकडूनच करण्यात यावी व या संदर्भात पुरवठादाराचा GSTIN असलेला Tax Invoice विद्यापीठास हिशेबासोबत सादर करावा. अन्य प्रकारची देयके विद्यापीठाकडून स्विकारली जाणार नाहीत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
नियोजन व विकास
पुणे-७

# प्रस्ताव सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे

**unipune.ac.in - Home page - BOD Online – Login - For College Users - College Login & Password - Planning and Development**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
नियोजन व विकास
पुणे-७